


# धक्का!!

सुराज्य सोलापूर

शनिवार, दि. २७ एप्रिल २०२४ । पान १२

# सिघंमच्या भूमिकेवर मोहोळमध्ये पैजा!




**मोहोळ : माजी आमदार रमेश कदम हे मोहोळ तालुक्याच्या राजकारणात सक्रीय होत असल्याचे आता स्पष्ट होऊ लागले आहे. लोकसभा निवडणुकीत त्यांची नेमकी काय भूमिका असणार?याबाबत तालुक्यातील नागरिकांमध्ये मोठे औत्सुक्य आहे. याच औत्सुक्याचे उत्तर उद्या रविवारी, २८ तारखेला मिळणार आहे. सोलापूर लोकसभा निवडणुकीमधील आपली भूमिका मांडण्यासाठी त्यांनी मोहोळच्या कृषी उत्पन्न बाजार समितीच्या आवारात सायंकाळी पाच वाजता सभा ठेवली आहे. दरम्यान, माजी आमदार कदम हे महाविकास आघाडीच्या उमेदवार प्रणिती शिंदे यांनाच समर्थन देण्याची भूमिका घेतील, असं निश्चितपणानं मानलं जात आहे. केवळ मोहोळ विधानसभेच्याच नव्हे तर सोलापूर लोकसभेच्या मतदार संघात त्यांच्या भूमिकेबद्दलच्या उत्सुकतेची चर्चा आहे. यावर कार्यकर्त्यांमध्ये पैजाही लागल्या आहेत.**

मोहोळ विधान सभा मतदार संघात २०१४ पूर्वी येताना मातंग समाज अभ्यास आयोग अध्यक्ष म्हणून ते आले होते. त्यावेळी यावली गावात वाद झाला होता. यावेळी सामंजस्याने त्यांनी बाजू हाताळली होती. तेव्हांपासून मोहोळ तालुक्यात ते चर्चेत आले. त्यानंतर अण्णाभाऊ साठे आर्थिक विकास महामंडळाचे अध्यक्ष म्हणून आले. राज्यातील कार्यकर्त्यांचा मोठा मेळावा वाघोली येथील सूत मिलवर झाला होता. यावेळी समाजातल्या तरुणांनी पारंपरिक व्यवसायांबरोबर इतर व्यवसायाकडेही वळावे यासाठी प्रयत्न झाले. त्यानंतर मोहोळ येथील घाटुळे मंगल कार्यालयात आर्थिक विकास महामंडळाचा मोठा कार्यक्रम झाला अन् त्यांच कार्यक्रमाने ते तालुक्यातील प्रस्थापित नेते व जनतेच्या मनात घर करून राहिले.२०१४ च्या विधासभा निवडणुकीत त्यांचे काम करण्याची धमक त्यांच्या पक्ष श्रेष्ठींनी पाहिली अन् त्यांना आमदारकीची संधी दिली आणि मोहोळ तालुक्यातील जनतेनेही त्यांना आमदार केले.

रमेश कदम हे मोहोळचे आमदार झाल्यानंतर त्यांनी मोहोळ मतदार संघाचा अभ्यास केला. जनतेच्या नेमक्या समस्या काय आहेत? त्या जाणून घेतल्या अन् कामाला सुरुवात केली. रस्ता, वीज, पाणी याच कायम स्वरूपी समस्या त्यांच्या निदर्शनाला आल्या आणि त्यांनी त्या समस्यांवर कायम स्वरूपी तोडगा काढला. 'मागेल त्याला पाणी, मागेल त्याला रस्ता' हा पॅटर्न त्यांनी मतदार संघात राबवला. कुठे शासनाच्या निधीतून ता कुठे स्व:खर्चातून निधी उपलब्ध करून दिला. त्यांचा हा पॅटर्न राज्यभर गाजला. महाराष्ट्रातील राजकीय मंडळीत याची चर्चा होऊ लागली. समस्याच संपल्यावर जनता नेतेमंडळींना पुन्हा विचारेल का याबाबतही चर्चा होवू लागली अन् काहींना त्यांचे काम खुपूही लागले. त्यांच्या सात आठ महिन्याच्या कालावधीत ते मतदारसंघातच नव्हे, तर राज्यात लोकप्रिय झाले. हीच त्यांची लोकप्रियता काहींना खुपू लागली अन् याच कालावधीत आण्णा भाऊ साठे आर्थिक विकास महामंडळातील अपहाराच्या आरोपाखाली त्यांना जेलमध्ये जावे लागले. तरीपण त्यांचे मतदार संघात काम सुरू होते. बाहेरील नेते मंडळी आमदार फंडातून निधी आणून काम करीतच होती. परंतु, त्यांनी केलेल्या कामाची क्रेझ कायम राहिली आहे. २०१९ मध्ये झालेल्या विधानसभा निवडणुकीत नुसता फॉर्म भरला. ना प्रचार.. ना भेटी गाठी... तरीही पंचवीस हजार मते त्यांना मिळाली त्यामुळे सिंघम आमदार म्हणून निर्माण झालेली क्रेझ त्यांच्या कामाची पद्धत मतदार संघातील मतदाराच्या मनात घर करून आहे. म्हणूनच जेलमधून सुटल्या नंतर मोहोळ येथील सभेला तरुणांनी मोठी गर्दी केली होती. अजून विधानसभा निवडणूक लांब असली तरी सध्या सुरु असलेल्या लोकसभेच्या निवडणुकीबाबत त्यांची भूमिका काय? हे स्पष्ट करण्यासाठीच त्यांनी रविवारी सायंकाळी सभेचे आयोजन केले आहे. त्यांचा निर्णय काय होणार? कोणाला पाठिंबा देणार? यासाठी काहींनी पैजाही लावल्याचे समजते. परंतुरमेश कदम हे त्यांची भूमिका स्पष्ट करेपर्यंत म्हणजे रविवारी सायंकाळपर्यंत निर्णयाची वाटच पहावी लागणर आहे.



# राष्ट्रवादीचा रूसवा प्रणिती शिंदे कसा काढणार?



**सोलापूर : सोलापूर लोकसभेची निवडणूक रंगतदार होत आहे. महाविकास आघाडीच्या उमेदवार आमदार प्रणिती शिंदे या महायुतीचे उमेदवार आमदार राम सातपुतेंशी इथल्या महासंग्रमात कडवी झुंज देत आहेत. प्रणिती शिंदे यांनी मतदार संघामधील आपल्या प्रचारात मोठी आघाडी घेतली आहे. मात्र दुसरीकडे महाविकास आघाडीमधील त्यांचा मित्र पक्ष असलेल्या राष्ट्रवादी शरदचंद्र पवार गटाची साथ त्यांना मिळत नसल्याची चर्चा राजकीय वर्तुळात सुरू आहे. 'महाआघाडीत बिघाडी' झाली की काय असे कार्यकर्ते बोलत आहेत. दरम्यान, राष्ट्रवादी शरदचंद्र पवार (तुतारी) गटाच्या मताधिक्याची ताकद आमदार प्रणिती शिंदे यांच्या पाठिशी लागण्याच्या पार्श्वभूमीवर, माजी गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे काय भूमिका घेतात? कोणाचे मन कसे वळवितात? कोणाचा रुसवा फुगवा कसे काढतात? हे पाहणं महत्वाचं आहे.**

सोलापूर लोकसभा निवडणुकीसाठी केवळ दहा दिवसांचा कालावधी उरला आहे. आमदार प्रणिती शिंदे आणि आमदार राम सातपुते यांच्यामध्ये अत्यंत चुरशीत लढत होत आहे. आमदार प्रणिती शिंदे या कॉर्नर बैठका, पदयात्रा, प्रचार सभा, गावभेट दौरे यांनी संपूर्ण मतदारसंघ ढवळून काढत आहेत. दुसरीकडे त्यांचा मित्र पक्ष असलेल्या शिवसेनेची साथ त्यांना मिळत आहे. मात्र राष्ट्रवादी शरदचंद्र पवार गटाची साथ त्यांना अद्यापपर्यंत मिळत नसल्याची चर्चा खुद्द कॉंग्रेसह, शिवसेना एकनाथ शिंदे गट आणि राष्ट्रवादी शरदचंद्र पवार गटात आहे.

आज शुक्रवारी उद्धव ठाकरे गटाच्या पदाधिकाऱ्यांची पत्रकार परिषद होती. उध्दव ठाकरे आणि शरद पवार या दोघांचा २९ एप्रिल रोजी सोलापूर दौरा ठरलेला आहे. याची माहिती देण्यासाठी ही पत्रकार परिषद आयोजित केली होती. या पत्रकार परिषदेला माजी मंत्री उत्तम प्रकाश खंदारे, शिवसेनेचे नेते पुरुषोत्तम बरडे,गणेश वानकर अस्मिता गायकवाड यांच्यासह कॉंग्रेसचे शहराध्यक्ष चेतन नरोटे आदींची उपस्थित होती.

मात्र या पत्रकार परिषदेला राष्ट्रवादी शरदचंद्र पवार गटाचा एकही पदाधिकारी उपस्थित नव्हता. याबाबत शिवसेना पदाधिकारी आणि चेतन नरोटे यांना विचारणा केली असता, आम्ही त्यांना फोनवरून कळविले आहे ते लवकरच येतील असे उत्तर देण्यात आले. तथापि, पत्रकार परिषद संपली तरी राष्ट्रवादीचा कोणताही पदाधिकारी उपस्थित राहिला नाही. त्यामुळे अद्यापही शरदचंद्र पवार गटाच्या पदाधिकाऱ्यांचे आणि कॉंग्रेसचे सूत जुळले नसल्याची चर्चा सुरू झाली आहे. वास्तविक पाहता याबाबत अधिक माहिती घेतली असता शरद पवार गटाच्या पदाधिकाऱ्यांना ही पत्रकार परिषद आहे, याची माहिती केवळ अर्धा तास अगोदर देण्यात आली. त्यामुळे या पत्रकार परिषदेला कोणीही उपस्थित राहिला नाही. कॉंग्रेसच्या उमेदवार प्रणिती शिंदे अद्याप आम्हाला संपर्क साधत नसल्याच्या तक्रारी शरद पवार गटाचे अनेक नेते करत आहेत. त्यामुळे शरदचंद्र पवार गटातील नेत्यांचे कार्यकर्तेही प्रचारात अद्याप सक्रिय नसल्याचे दिसत आहे.





### चर्चा अशीसुद्धा अन् तशीसुद्धा

शरदचंद्र पवार गट गटामधील नेते हे पूर्वी कॉंग्रेसमध्येच होते. सुधीर खरटमल, ॲड. यू. एन. बेरिया, माजी नगरसेवक तौफिक शेख, माजी महापौर नलिनी चंदिले आदी नेत्यांनी आमदार प्रणिती शिंदे यांच्या कारभाराला कंटाळूनच कॉंग्रेस पक्ष सोडला होता. आता त्यांचाच प्रचार या लोकांना करण्याची वेळ आली आहे. त्यामुळेच या लोकांनी प्रचारातून काढता पाय घेतला की काय अशी चर्चा होत आहे. शरदचंद्र पवार गटाचे नेते महेश कोठे हे मात्र नुकत्याच झालेल्या राहुल गांधी यांच्या सभेदरम्यान उपस्थित होते. याशिवाय त्यांनी शहर उत्तर मध्ये काही ठिकाणी पदयात्राही काढल्या आहेत. मात्र बाकीचे पदाधिकारी मात्र प्रचारात दिसून येत नाहीत.

# पवार, ठाकरे, फडणवीसांचा बार्शीचा राजकारणावर प्रभाव

बार्शी/सचिन अपसिंगकर

**बार्शीच्या राजकारणावर सर्वाधिक प्रभाव आजपर्यंत केवळ पवार काका पुतणे ठाकरे व फडणवीस यांचाच राहिलेला आहे. त्यामुळे यदांच्या धाराशीव लोकसभा निवडणुकीत महायुती व महाविकास आघाडी यांच्या उमेदवारांच्या प्रचारार्थ, बार्शीमध्ये या दिग्गज नेत्यांच्या सभा होणार का? व त्या सभा निवडणुकीला निर्णायक वळण देणार का याकडे सर्वांचे लक्ष आहे.**

महाराष्ट्राच्या राजकारणावर अधिराज्य गाजविणारे राष्ट्रीय नेते शरद पवार तसेच त्यांचे पुतणे राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार त्याचबरोबर शिवसेनेचे उद्धव ठाकरे व भारतीय जनता पार्टीचे नेते देवेंद्र फडणवीस यांचा बार्शीच्या राजकारणावर प्रभाव असून विविध निवडणुकांच्या निमित्ताने, होणाऱ्या त्यांच्या सभा गाजल्या आहेत. गेल्या तीन दशकांच्या राजकारणात १९९५ साली बार्शीच्या ऐतिहासिक भगवंत मैदानावर तत्कालीन कॉंग्रेस नेते मुख्यमंत्री शरद पवार यांची कॉंग्रेसचे उमेदवार प्रभाताई झाडबुके यांच्या प्रचारासाठी विधानसभा निवडणुकीच्या काळात झोली सभा गाजली होती. या सभेत पवार यांनी प्रभाताईंचा उल्लेख थोरली बहिण आणि त्यांच्या विरोधात उभे राहिलेले अपक्ष उमेदवार दिलीप सोपल यांचा उल्लेख धाकटा भाऊ असा केला होता.

मात्र चाणाक्ष सोपल समर्थकांनी हा धाकटा भाऊ हा शब्द प्रयोग इतका सर्वतोमुखी केला की त्या सभेने विधानसभा निवडणुकीचे वातावरणाला वेगळे वळण लागले व सोपल त्या निवडणुकीत विजयी झाले.

त्यानंतर १९९९ साली त्याच भगवंत मेदानावर तत्कालीन शिवसेना शहरप्रमुख व १९९९ च्या विधानसभा निवडणुकीतील शिवसेनेचे उमेदवार राजेंद्र राऊत यांच्या प्रचारात शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे यांची सभा झाली होती. ती सभा विराट गर्दीमुळे गाजली. त्या सभेत शिवसेना प्रमुखांनी सोपल यांनी राज्यमंत्रीपद शिवसेनेच्या कोट्यातून मिळविले व नंतर शिवसेना सोडली ही 'सल' बोलून दाखवली, सोपल यांनी शिवसेनेकडून मंत्रीपद घेताना हातात सॅण्डविचचा तुकडा घेऊन शिवसेना सोडणार नाही अशी शपथ घेतल्याचे सांगितले होते. त्या सभेमुळेदेखील बार्शीचे वातावरण फिरले होते. त्या निवडणुकीत राऊत यांचा अवघ्या १२५ मतांनी पराभव झाला होता. त्यानंतर बार्शीमध्ये तत्कालीन उपमुख्यमंत्री अजित पवार, मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण, मुख्यमंत्री नारायण राणे यांच्याही सभा गाजल्या होत्या.

मात्र या नेत्यांचा तालुक्याच्या राजकारणावर फारसा प्रभाव उमटला नाही.



त्यापैकी अजित पवार व माजी मंत्री दिलीप सोपल यांच्या राजकीय संबंधांची तालुक्याला वारंवार प्रचिती आली. सोपल राष्ट्रवादीत असताना अजित पवार यांनी सोपल यांच्यासाठी नगरपालिकेच्या निवडणुकीतदेखील प्रचार सभा घेतल्या. केवळ प्रचार सभा घेऊनच अजित पवार थांबले नाहीत, तर त्यांनी नगरपालिकेच्या निवडणुकीचे मतदानाच्या आदल्या दिवशी बार्शीत तळ ठोकला होता व सोपल यांच्या विजयास हातभार लावला होता. सध्या शिवसेनेचे प्रमुख उध्दव ठाकरे यांच्याही बार्शीत सभा झाल्या. २०१४ मध्ये राऊत यांनी कॉंग्रेसला रामराम ठोकला व लोकसभा निवडणुकीच्या तोंडावर शिवसेनेत प्रवेश केला. त्यावेळी उध्दव ठाकरे यांच्या उपस्थितीमध्ये राऊत यांनी पुन्हा शिवसेना प्रवेश केला व त्यानंतर ठाकरे यांनी त्यांच्यासाठी घेतलेली सभा सुध्दा गाजली.

ठाकरे यांच्या उपस्थितीमध्ये शिवसेना नेते भाऊसाहेब आंधळकर यांनीदेखील शिवसेनेत प्रवेश केला होता. त्यापाठोपाठ २०१४ साली विधानसभेच्या निवडणुकीत तत्कालीन विरोधी पक्ष नेते देवेद्र फडणवीस यांची भाजपा उमेदवार राजेंद्र मिरगणे यांच्या प्रचारासाठी पांडे चौकात मोठी सभा झाली होती. त्यानंतर फडणवीस यांनी भाजपच्यावतीने मिरगणे यांनी पॅनेल उभे केल्यानंतर सुद्धा जाहीर सभा घेतली होती.

तसेच त्यांनी मिरगणे यांनी आयोजित केलेल्या भगवंत मैदानावरील शेतकरी मेळाव्यालाही संबोधित केले होते. २०१७ साली विद्यमान आमदार राजेंद्र राऊत यांनी शिवसेना सोडून भाजपमध्ये प्रवेश केला. त्यावेळेला देवेंद्र फडणवीस यांनीदेखील जाहीर सभा घेतली होती. फडणवीस यांच्या सभेनंतर बार्शीत २०१९ साली राष्ट्रवादीचे उमेदवार निरंजन भूमकर यांच्या प्रचारासाठी विधानसभा निवडणुकीच्या काळात झालेली शरद पवार यांची सभा त्यांनी केलेल्या हातवाऱ्यांमुळे गाजली होती. त्यासभेत पवार यांनी आता पुढे विकास करायचा म्हणता आतापर्यंत काय केले? असे म्हणत हातवारे केले होते.

त्यानंतर २०१९ साली शिवसेना प्रमुख उद्धव ठाकरे यांनी उमेदवार दिलीप सोपल यांच्या प्रचारार्थ पांडे चौकात सभा घेतली होती. ती सभादेखील ठाकरे यांनी तत्कालीन अपक्ष उमेदवार राजेंद्र राऊत यांच्या विरोधात केलेल्या कडक टिकेमुळे गाजली होती.